# अश्लील चॅटिग महागात पडली

नागोठणे पोलीस ठाणे । कॉ.गु.र.न. ७२/२०१६ भा.द.वि.क. ३५४(ड),(२) आय.टी.ॲक्ट ६६ (ड),६६ (ई),६७,७६ (अ),६७(ब) या गुन्हयांत अज्ञात आरोपीने **Iqbalkhan3477** या नावाने इंस्टाग्राम अंकाऊट वापरून फिर्यादी यांचे इंस्टाग्राम अंकाऊटवर अल्पवयीन साक्षीदार यांचे अर्ध नग्न फोटो प्रसारीत करून अश्लिल संभाषण केले आहे. त्यांनतर आरोपीने **Iqbalkhan3477** हया इंस्टाग्राम अंकाऊटचे नाव **RAKESH_456_66** असे बदलुन पुन्हा फिर्यादी यांना अल्पवयीन साक्षीदार यांचे नग्न फोटो पाठवुन अत्यंत अश्लिल संभाषण केले म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारी वरून अज्ञात आरोपीतावर गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हा दाखल झाल्या नंतर सदर गुन्हयातील तपासीक अंमलदार पोलीस निरीक्षक नागोठणे यांनी सदर गुन्हा हा सायबर क्राईम संबधाने असल्याने पुढील तपास व तांत्रीक मदत करणे बाबत सायबर क्राईम सेल पोलीस अधीक्षक कार्यालय रायगड अलिबाग यांना कळविल्या नंतर सदर गुन्हयाचे कामी सायबर क्राईम सेल चे तत्कालीन प्रभारी अधीकारी श्री. प्रमोद अशोकराव बडाख यांनी गुन्हयांचे अनुषंगाने आवश्यक तांत्रिक माहिती मिळणे करीता इंस्टाग्राम यांचे सोबत पत्रव्यवहार सुरू केला व गुन्हयाचे कामी वापरल्या गेलेल्या ३ बोगस अकाऊंटचा आय.पी.ॲड्रेस मागविण्यात आले प्राप्त माहितीचे विश्लेषण करून आरोपीत याने वापरलेल्या मोबाईलचा शोध घेवुन सदर मोबाईल कोणाचे नावावर आहे तसेच त्याचा संपुर्ण पत्ता प्राप्त केला असता आरोपीताचे २ मोबाईल असल्याचे निष्पन्न झाले असुन सदर दोन्ही मोबाईल क्रमांक लखनऊ उत्तर प्रदेश येथील असल्याचे निष्पन्न झाले.सदर ठिकाणी तपास पथक पाठवुन संशयीत आरोपी अहमद शराफत या २० वर्षीय तरूणास ताब्यात घेतल्यानंतर त्यांचे कडील दोनही मोबाईल ताब्यात घेतले असता त्यामध्ये गुन्हयांचे पुरावे प्राप्त झाले असुन आरोपीत याने देखील गुन्हयांची कबुली दिलेली आहे. सदर गुन्हा मा. पोलीस अधीक्षक सो,श्री. सुवेज हक तसेच अपर पोलीस अधीक्षक श्री. संजयकुमार पाटील यांचे मार्गदर्शना खाली १. श्री. प्रमोद अशोकराव बडाख, सहा.पोलीस निरीक्षक, सायबर क्राईम सेल, मोहन पोशा मोरे, पोह/१९५४, अजय दत्ताराम मोहिते, पोह/१८५८, पोशि/२२९३ तुषार तुकाराम घरत सर्व सायबर लॅब यांनी उघडकीस आणला आहे. पुढील तपास नोगोठणे पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री. भोसले हे करीत आहेत.